**<u>विशेष दिवाणी दावा क्र. २०/२०२३ (जुना नियमित दिवाणी दावा क्र. ३/२०१८) मध्ये निशाणी क्र. ६७ कडील अर्जावर आदेश</u>**

१) प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ तर्फे त्यांच्याविरुध्द निशाणी क्र. १ वर दिनांक २२/१२/२०२३ रोजी पारीत करण्यात आलेला विना लेखी जबाब प्रकरण चालविण्याचा आदेश रद्द करुन लेखी जबाब दाखल करण्यास परवानगी मिळण्याकरीता दाखल केला आहे.

२) प्रतिवादी क्र. १ च्या प्रस्तुत अर्जातील कथनानुसार प्रतिवादी क्र. १ हा ८० वर्षाचा वृद्ध व्यक्ती असून वृद्धपकाळातील आजारामुळे तो न्यायालयात हजर राहून लेखी जबाब दाखल करण्याच्या स्थितीत नव्हता. तसेच लेखी जबाब दाखल करण्यासाठी आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे प्रतिवादी क्र. १ जवळ उपलब्ध नव्हती व ती कागदपत्रे नागपूर येथील वकीलाकडे होती. तसेच दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, दिग्रस यांनी निशाणी क्र. ११ कडील अर्जावर पारीत केलेल्या आदेशानुसार वादीने या प्रकरणात दाव्याचे मुल्यांकन दुरुस्त केले नाही व आवश्यक तो कोर्ट फी स्टॅम्प दिला नाही. प्रतिवादी क्र. १ ने या अर्जात अशी विनंती केली आहे की, प्रतिवादी क्र. १ विरुद्ध पारीत करण्यात आलेला प्रकरण विना लेखी जबाब चालविण्याचा आदेश रद्द करुन प्रतिवादी क्र. १ याला या प्रकरणात त्याचा लेखी जबाब दाखल करण्यास परवानगी द्यावी.

३) वादीने प्रस्तुत अर्जास निशाणी क्र. ६८ कडे जबाब दाखल करुन प्रस्तुत अर्जास विरोध केला आहे. वादीच्या निशाणी क्र. ६८ कडील लेखी जबाबातील कथनानुसार वादीने सदर दावा सन २०१८ मध्ये

दाखल केला असून समन्सची बजावणी झाल्यावर प्रतिवादी क्र. १ हा निशाणी क्र. ९ कडे वकील पत्र दाखल करुन या दाव्यात हजर झाला आहे. त्यानंतर प्रतिवादी क्र. १ ने अनेक तारखांना लेखी जबाब दाखल करण्यास मुदत मिळण्यासाठी अर्ज दिले आहेत व त्यानुसार प्रतिवादी क्र. १ ला लेखी जबाब दाखल करण्यासाठी वेळोवेळी मुदत देण्यात आली आहे. प्रतिवादी क्र. १ याने या प्रकरणात दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ७, नियम ११ नुसार निशाणी क्र. ११ कडे अर्ज दाखल केला होता. सदरचा अर्ज दि. १९/०८/२०२० रोजी मंजूर झाल्यानंतर वादीने त्या आदेशाविरुद्ध मा. मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथे रिट पिटीशन क्र. २९२२/२०२० दाखल केले होते व त्या रिट पिटीशनमधील आदेशानुसार वादीने विहीत मुदतीत तुटीचा मुद्रांक न्यायालयात दाखल केला आहे व त्यानंतर सदरचा दावा दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, दिग्रस यांच्या न्यायालयातून या न्यायालयात वर्ग करण्यात आला आहे. त्यानंतर प्रतिवादी क्र. १ हा या न्यायालयात दि. २४/११/२०२३ रोजी हजर झाला आहे. प्रतिवादी क्र. १ ने या न्यायालयात हजर झाल्यानंतर देखील लेखी जबाब दाखल केला नाही व निशाणी क्र. ६५ कडे अर्ज दाखल करुन लेखी जबाब दाखल करण्यास वेळ मागितला. प्रतिवादी क्र.१ यांनी दि. २२/१२/२०२३ पर्यंत लेखी जबाब दाखल न केल्याने प्रतिवादीचा लेखी जबाब दाखल करण्यास मुदत मिळण्यासाठीचा निशाणी क्र. ६६ कडील अर्ज न्यायालयाने नामंजूर केला आहे व त्या दिवशी प्रतिवादी क्र. १ विरुद्ध विना लेखी जबाब प्रकरण चालविण्याबाबत निशाणी क्र. १ वर आदेश पारीत केला आहे. वादीच्या निशाणी क्र. ६८ कडील जबाबातील कथनानुसार प्रतिवादी क्र. १ ने निशाणी क्र. ६७

कडील अर्जामध्ये लेखी जबाब दाखल करण्यास झालेल्या ५ वर्ष विलंबाबाबत कोणतीही संयुक्तिक कारणे नमूद केली नाहीत. वादीने पुढे असे कथन केले आहे की, जाणुन बुजून केलेला उशीर क्षमापीत केल्यास व लेखी जबाब दाखल करण्यास परवानगी दिल्यास वादीस त्रासाचे होणार आहे. वादीने शेवटी अशी विनंती केली आहे की, प्रतिवादी क्र. १ चा निशाणी क्र. ६७ कडील अर्ज खारीज करण्यात यावा.

४) प्रस्तुत अर्जाच्या कामी प्रतिवादी क्र. १ तर्फे विद्वान वकील श्री टी. एम. खान व वादीतर्फे विद्वान वकील श्री एस. एस. व्यवहारे यांचा युक्तीवाद ऐकला. रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले.

५) दोन्ही पक्षातील विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला असता व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता असे दिसुन येते की, वादीने प्रस्तुतचा दावा सुरुवातीला दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, दिग्रस यांच्या न्यायालयात दिनांक १५/०१/२०१८ रोजी दाखल केला आहे. प्रस्तुत दाव्याच्या समन्सची बजावणी झाल्यानंतर प्रतिवादी क्र. १ हा दिनांक २८/०२/२०१८ रोजी निशाणी क्र. ९ कडे वकीलपत्र दाखल करुन हजर झाला आहे. प्रतिवादी क्र. १ हा या कामी हजर झाल्यानंतर प्रतिवादी क्र. १ ने अनेक तारखांना मुदतीचे अर्ज दाखल केले आहेत. प्रतिवादी क्र. १ याने निशाणी क्र. ११ कडे दि. प्र. सं. क्रम ७, नियम ११ मधील तरतुदीप्रमाणे अर्ज दाखल केला आहे. त्या अर्जावर न्यायालयाने दिनांक १९/०८/२०२० रोजी आदेश पारीत केला आहे व त्यानुसार वादीला सदर आदेशामध्ये नमूद केल्यानुसार दाव्याचे मुल्यांकन दुरुस्त करण्याबाबत व आवश्यक तो कोर्ट फी स्टॅम्प दाखल करण्याबाबत

आदेशीत केले आहे. वादीने त्या आदेशाविरुद्ध मा. मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथे रिट पिटीशन क्र. २९२२/२०२० दाखल केले होते. सदरचे रिट पिटीशन मा. मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक ३०/०१/२०२३ रोजीच्या आदेशानुसार फेटाळले आहे व वादीला निशाणी क्र. ११ कडील अर्जावरील आदेशानुसारचा कोर्ट फी स्टॅम्प दाखल करण्यासाठी ३ आठवड्यांची मुदत दिली आहे. त्यानंतर वादीने दि. १५/०२/२०२३ रोजी प्रकरण बोर्डावर घेऊन रुपये १८,५००/– इतका मुद्रांक दाखल करण्यास परवानगी मिळण्यासाठी दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, दिग्रस यांच्या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे व तो अर्ज न्यायालयाने मंजूर केला आहे व त्यानुसार निशाणी क्र. ५१ वरील पुरसीसद्वारे वादीने रुपये १८,५००/– चा मुद्रांक दाखल केला आहे. त्यानुसार दाव्याचे मुल्यांकन हे रुपये पाच लाखापेक्षा जास्त झाल्याने मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश साहेब, यवतमाळ यांचा आदेश जावक क्र. बी–१(२)/सिव्हील/एस.डब्ल्यू./६७३१/२०२३, दि. २६/०६/२०२३ नुसार हा दावा सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, दिग्रस यांच्या न्यायालयातून या न्यायालयात वर्ग झाला आहे. हा दावा या न्यायालयात वर्ग झाल्यानंतर प्रतिवादी क्र. १ हा या प्रकरणात दिनांक २४/११/२०२३ रोजी निशाणी क्र. ६४ कडे वकीलपत्र दाखल करुन हजर झाला आहे. त्या तारखेला देखील प्रतिवादी क्र. १ ने त्यांचा लेखी जबाब दाखल केला नाही. त्यानंतर दिनांक २२/१२/२०२३ रोजी प्रतिवादी क्र. १ तर्फे लेखी जबाब दाखल करण्यास मुदत मिळण्यासाठी दाखल केलेला निशाणी क्र. ६६ कडील अर्ज या न्यायालयाने नामंजूर केला आहे व त्यानुसार त्याच दिवशी निशाणी क्र. १ वर प्रस्तुत दावा

प्रतिवादी क्र. १ विरुद्ध विना लेखी जबाब चालविण्याबाबतचा आदेश पारीत केला आहे. त्यानंतर प्रतिवादी क्र. १ ने दिनांक ०२/०२/२०२४ रोजी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. यावरुन असे दिसून येते की, प्रतिवादी क्र. १ हा दिनांक २८/०२/२०१८ रोजी या प्रकरणात निशाणी क्र. ९ कडे वकीलपत्र दाखल करुन हजर झाल्यानंतर दिनांक २२/१२/२०२३ रोजीपर्यंत प्रतिवादी क्र. १ ने लेखी जबाब दाखल केलेला नाही व त्यामुळे दिनांक २२/१२/२०२३ रोजी प्रस्तुत दावा प्रतिवादी क्र. १ विरुद्ध विना लेखी जबाब चालविण्याबाबतचा आदेश निशाणी क्र. १ वर पारीत केला आहे. प्रतिवादी क्र. १ हा या कामी हजर झाल्याच्या दिनांकापासून प्रतिवादी क्र. १ ने प्रस्तुतचा निशाणी क्र. ६७ कडील अर्ज दाखल करेपर्यंत जवळपास ६ वर्षाचा कालावधी उलटून गेला आहे. प्रतिवादी क्र. १ यांना लेखी जबाब दाखल करण्यास जवळपास ६ वर्षांचा विलंब झाला आहे. त्यामुळे या ठिकाणी हे पाहणे आवश्यक आहे की, प्रतिवादी क्र. १ ने या अर्जामध्ये लेखी जबाब दाखल करण्यास झालेल्या विलंबाचे सविस्तर स्पष्टीकरण देण्यासाठी संयुक्तिक कारणे नमूद केली आहेत किंवा कसे व झालेल्या विलंबाचे सविस्तर स्पष्टीकरण दिले आहे किंवा कसे. प्रतिवादी क्र. १ च्या प्रस्तुत अर्जातील कथनानुसार प्रतिवादी क्र. १ हा ८० वर्षाचा वृद्ध व्यक्ती असून वृद्धपकाळातील आजारामुळे तो न्यायालयात हजर राहून लेखी जबाब दाखल करण्याच्या स्थितीत नव्हता. परंतु प्रतिवादी क्र. १ यांनी त्यांना वृद्धपकाळातील नेमका कोणता आजार झाला होता व नेमक्या कोणत्या आजारामुळे ते न्यायालयात हजर राहून लेखी जबाब दाखल करण्याच्या स्थितीत नव्हते याबाबत स्पष्टपणे कथन केलेले नाही. त्यामुळे प्रतिवादी

क्र. १ ने प्रस्तुत अर्जामध्ये वृद्धपकाळातील आजारपणाबाबत नमूद केलेले कारण संयुक्तिक वाटत नाही. तसेच प्रतिवादी क्र. १ च्या प्रस्तुत अर्जातील कथनानुसार लेखी जबाब दाखल करण्यासाठी आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे प्रतिवादी क्र. १ जवळ उपलब्ध नव्हती व ती कागदपत्रे नागपूर येथील वकीलाकडे होती. वर नमूद केल्याप्रमाणे प्रतिवादी क्र. १ हा दिनांक २८/०२/२०१८ रोजी निशाणी क्र. ९ कडे वकीलपत्र दाखल करुन या प्रकरणात हजर झाल्यानंतर प्रतिवादी क्र. १ ने निशाणी क्र. ११ कडे दि. प्र. सं. क्रम ७, नियम ११ मधील तरतुदीप्रमाणे अर्ज दाखल केला आहे. त्या अर्जावर न्यायालयाने दिनांक १९/०८/२०२० रोजी आदेश पारीत केला आहे व त्यानंतर वादीने त्या आदेशाविरुद्ध मा. मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथे रिट पिटीशन क्र. २९२२/२०२० दाखल केले होते. यावरुन असे दिसून येते की, प्रतिवादी क्र. १ हा या कामी हजर झाल्यानंतर न्यायालयाने निशाणी क्र. ११ कडील अर्जावर आदेश पारीत करेपर्यंत म्हणजेच दिनांक १९/०८/२०२० रोजीपर्यंत जवळपास अडीच वर्ष प्रतिवादी क्र. १ ला लेखी जबाब दाखल करण्यासाठी आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे प्रतिवादी क्र. १ जवळच होती. तरीही त्या कालावधीत प्रतिवादी क्र. १ ने लेखी जबाब दाखल केलेला नाही. त्यामुळे वरील नमूद कारणांमुळे प्रतिवादी क्र.१ ने प्रस्तुत अर्जामध्ये लेखी जबाब दाखल करण्यास आवश्यक असलेल्या कागदपत्रांबाबत नमूद केलेले कारण संयुक्तिक नाही. प्रतिवादी क्र. १ ने त्यांचा लेखी जबाब दाखल करण्यास झालेल्या जवळपास ६ वर्षाच्या विलंबाचे स्पष्टीकरण देण्यासाठी प्रस्तुत अर्जामध्ये नमूद केलेली कारणे ठोस व संयुक्तिक नाहीत. प्रतिवादी क्र. १ ने त्यांचा

लेखी जबाब दाखल करण्यास झालेल्या जवळपास ६ वर्षाच्या विलंबाचे प्रस्तुत अर्जामध्ये सविस्तर स्पष्टीकरण दिलेले नाही.

६) वादी हा या कामी "AIR ONLINE 2020 BOM 3156, Gunwantiben Kishorchandra Shan Vs. Manjulaben Indukumar Ghiya" या आदरणीय मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायनिवाड्यावर विसंबून राहिला आहे. मी उपरोक्त न्यायनिवाड्याचे अवलोकन केले. उपरोक्त न्यायनिवाड्यामध्ये आदरणीय मुंबई उच्च न्यायालयाने परिच्छेद क्र. १२ ते १४ मध्ये खालीलप्रमाणे मत व्यक्त केले आहे.

" 12. In this situation, the Court below was expected to test the reasons put-forth on behalf of the respondent in the application at Exhibit-32. A perusal of the said application shows that there is absence of detailed reasons or any cogent reason to explain the delay in filing of written statement before the Court below. While the suit was filed as far back as on 03/11/2014 and the respondent had appeared through advocate on 09/05/2014, the application for permission to file written statement was filed on 15/03/2019. No effort was made on behalf of the respondent in the application filed before the Court below at Exhibit-32 to give any cogent reason for such a huge delay. This is apart from the fact that on 28/03/2016, the Court below had itself passed an order directing that the suit would proceed without written statement. There was no effort made even in this application filed on 15/03/2019 on behalf of the respondent to seek variation of the order dated 28/03/2016 for enabling the respondent to file the written statement.

13. The Court below was expected to consider the application at Exhibit-32 on the basis of its contents, in the backdrop of

the aforesaid facts indicating deliberate delay on the part of the respondent and by applying the position of law as laid down by the Hon'ble Supreme Court and this Court in the context of Order VIII Rule 1 of the Civil Procedure Code, particularly pertaining to the responsibility on the part of the defendant to act in a diligent manner and in any case to explain before the Court with cogent reasons for delay in filing the written statement. A perusal of the impugned order shows that no such effort was made by the Court below and in a cryptic and casual manner the application at Exhibit- 32 stood allowed.

14. The learned counsel for the petitioners is justified in relying upon the judgment of this Court in the case of Parasmal Daulatram Jain Vs. Rameshwar Rathanlal Karwa (supra), wherein this Court has reiterated the position of law concerning the approach to be adopted by the Courts while considering permission to the defendant to file written statement beyond the stipulated period of time. This Court placed reliance on the judgment of the Hon'ble Supreme Court, wherein it has been categorically stated that even if the relevant provisions of the Code of Civil Procedure in this regard can be said to be directory and not mandatory, the Courts cannot permit laxity or gross negligence on the part of the defendant to be condoned while granting permission to file written statement. In the facts of the present case, this Court is of the opinion that if the impugned order passed by the Court below is upheld, it would amount to giving premium to the respondent, not only for laxity and gross negligence, but to tactics adopted by her to somehow delay the proceedings in the suit for eviction filed by the petitioners. Although, it is expected that Courts decide disputes between parties by giving opportunity to the contesting party to place their respective versions on merits, there are situations where

the Courts ought not to show misplaced indulgence to litigants like the respondent herein by adopting a liberal approach.”

उपरोक्त न्यायनिवाड्यामध्ये आदरणीय मुंबई उच्च न्यायालयाने व्यक्त केलेल्या मताच्या अनुषंगाने हातातील प्रकरणातील वस्तुस्थिती विचारात घेता असे दिसून येते की, वर नमूद केल्याप्रमाणे प्रतिवादी क्र. १ ने त्यांचा लेखी जबाब दाखल करण्यास झालेल्या जवळपास ६ वर्षाच्या विलंबाचे स्पष्टीकरण देण्यासाठी प्रस्तुत अर्जामध्ये नमूद केलेली कारणे ठोस व संयुक्तिक नाहीत. तसेच प्रतिवादी क्र. १ ने त्यांचा लेखी जबाब दाखल करण्यास झालेल्या जवळपास ६ वर्षाच्या विलंबाचे प्रस्तुत अर्जामध्ये सविस्तर स्पष्टीकरण दिलेले नाही. त्यामुळे वरील नमूद सर्व कारणांचा विचार करता माझ्या मते प्रस्तुतचा अर्ज समर्थनिय नाही व तो नामंजूर होण्यास पात्र आहे. सबब हे न्यायालय न्यायाच्या दृष्टीने खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**<u>आ दे श</u>**

१) प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात येतो.

२) वरीलप्रमाणे न्यायालयात आदेशाचे कथन करुन घोषीत करण्यात आला.

Digitally signed by PANDURANG LIMBAJI GHULE
Date: 2024.03.27 16:27:01 +0530

(पां. लिं. घुले)

दिनांक– २७/०३/२०२४ दिवाणी न्यायाधीश,व.स्तर, दारव्हा